महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र. ९/ १६८३३
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : १४/१०/२०२०

# परिपत्रक

**विषय : वीजेच्या कडकडाटासह मुसळधार पावसाच्या शक्यतेबाबत.**

**संदर्भ :** मंनिक-२०२०/प्र.क्र.१६/मंनिक-१ दि. १३.१०.२०२०.

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या ईशाऱ्यानुसार दि. १३.१०.२०२० ते १७.१०.२०२० या कालावधीत राज्यात वीजेच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता वर्तविली आहे. या अनुषंगाने आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन, यांनी मनुष्य हानी टाळण्याच्या दृष्टीकोनातून सर्व प्रशासकीय यंत्रणांना सतर्कतेचा ईशारा देण्याबाबतच्या सूचना संदर्भित पत्रान्वये जारी करण्यात आलेल्या आहेत.

२. आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग यांच्या पत्राच्या अनुषंगाने कंपनीच्या सर्व कार्यालयांमध्ये विशेषत: किनारपट्टी लगतच्या म्हणजेच मुंबई, मुंबई उपनगरे, ठाणे, पालघर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयातील सर्व कार्यालयांमध्ये उपरोक्त कालावधीमध्ये योग्य ती खबरदारी तसेच पावसाबाबत आढावा घेउन कर्मचाऱ्यांना उपस्थितीबाबतच्या सूचना देण्यात याव्यात. तसेच कंपनीच्या वितरण व्यवस्थेची हानी होउ नये याकरीता देखील योग्य त्या उपाययोजना करण्यात याव्यात.

३. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

सोबत : दि. १३.१०.२०२० रोजीचे शासन पत्र.

(कमांडर शिवाजी इंदलकर) (से.नि.)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

महाराष्ट्र शासन

**तात्काळ/अतिमहत्त्वाचे**

मंनिक- २०२०/ प्र.क्र.१६/मंनिक-१
आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक-१३.१०.२०२०

प्रति,
विभागीय आयुक्त (सर्व),
जिल्हाधिकारी (सर्व).

**विषय : वीजेच्या कडकडाटासह मुसळधार पावसाच्या शक्यतेबाबत.**

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या ईशाऱ्यानुसार दि. १३.१०.२०२० ते १७.१०.२०२० या कालावधीत राज्यात वीजेच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता वर्तविली आहे.

विशेषत: किनारपट्टीलगतच्या सर्व जिल्ह्यामध्ये वीजेच्या कडकडाटासह मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आलेली आहे. सदर कालावधीमध्ये आपल्या पातळीवरून सर्व प्रशासकीय यंत्रणांना सतर्कतेचा ईशारा देण्याबाबतच्या सुचना तात्काळ देण्यात याव्यात. जेणे करून मनुष्य हानी टाळता येणे शक्य होईल.

१३/१०

(हितेंद्र दुफारे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

प्रत,

१. विभागीय आपत्ती व्यवस्थापन समन्वयक (सर्व)
२. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी (सर्व)